आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
६ ऑक्टोबर २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- छोट्या आणि मध्यम उद्योगांसाठी १० हजार कोटींचा निधी स्थापन करायला केंद्रीय मंत्रिमंडळांची मान्यता

- हवाई दलाचे आगामी प्रमुख म्हणून एअर मार्शल आशुतोष दीक्षित यांची नियुक्ती

- मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधी पक्षांचा नवी दिल्लीत मोर्चा, संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याचा प्रयत्न असल्याची मुख्यमंत्र्यांची टीका

- इम्रान खान यांच्या सुटकेसाठी आयोजित केलेला मोर्चा स्थगित करुन चर्चेला येण्याचं पाकिस्तानच्या प्रधानमंत्र्यांचं विरोधी पक्षांना आवाहन

- यंदाचा भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार फ्रान्सिस हालझेन यांना जाहीर

आणि

- विश्वविजेत्या महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर कर्णधार पदावरून पायउतार

**<><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं आज १० हजार कोटी रुपयांचा SME वृद्धी निधी स्थापन करायला मंजुरी दिली. चांगली कामगिरी करण्याची शक्यता असलेल्या छोट्या आणि मध्यम आकाराच्या उद्योगांमध्ये या फंडाद्वारे दीर्घकालीन गुंतवणूक केली जाईल असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं.

**- - - होल्ड - अश्विनी वैष्णव बाइट - - -**

तसंच एकीकृत वाहतूक आणि लॉजिस्टिक प्राधिकरण स्थापन करायलाही आजच्या बैठकीत मंजुरी मिळाली. रस्ते, रेल्वे, बंदरं, हवाई वाहतूक, जलवाहतूक यासारख्या सर्व प्रकारच्या वाहतुकीच्या मार्गांसाठी दीर्घकाळाचं नियोजन हे प्राधिकरण करेल, असं वैष्णव म्हणाले.

नरेंद्र मोदी यांच्या मुख्यमंत्री आणि प्रधानमंत्रीपदाच्या कारकिर्दीला २५ वर्षं झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठरावही या बैठकीत मंजूर झाला. यावेळी त्यांनी केलेल्या

महत्त्वपूर्ण कामांचा आढावा घेण्यात आला. ७ ऑक्टोबर २००१ रोजी मोदी यांनी पहिल्यांदा गुजरातच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती.

<><><><>

केंद्र सरकारनं हवाई दलाचे २९ वे प्रमुख म्हणून एअर मार्शल आशुतोष दीक्षित यांची नियुक्ती केली आहे. ३१ तारखेला ते हा पदभार स्वीकारतील. विद्यमान हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग सेवानिवृत्त होत असल्यानं ही नेमणूक झाली आहे. एअर मार्शल दीक्षित यांना साडेतीन हजार तासांहून अधिक काळ विमान उडवण्याचा अनुभव असून, त्यांनी आतापर्यंत विविध महत्त्वपूर्ण कार्यान्वयन आणि धोरणात्मक पदांवर काम केलं आहे.

<><><><>

भारतीय रेल्वेनं ४० तासांपेक्षा जास्त प्रवास करणाऱ्या ११ लांब पल्ल्याच्या गाड्यांमधल्या स्वच्छतेवर अधिक देखरेख ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात पुणे सुपौल एक्सप्रेस, झेलम एक्स्प्रेस, राजगीर-मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनस जनता एक्सप्रेस यांचा समावेश आहे. या लांब पल्ल्याच्या गाड्यांमधली स्वच्छता, शौचालयं, कचरा व्यवस्थापन आणि डब्यामधल्या कमतरता प्रवासादरम्यान त्वरित दूर केल्या जातील.

<><><><>

नद्यांच्या खोऱ्यांमध्ये होणाऱ्या बेकायदा वाळू उपशाबाबत अहवाल सादर करावा, असं आज सर्वोच्च न्यायालयानं केंद्रीय अधिकारप्रदत्त समितीला सांगितलं. तसंच, बेसुमार बेकायदा वाळू उपशाचा मोठा उपद्रव असलेल्या राष्ट्रीय चंबळ घडियाल अभयारण्याच्या आणि आसपासच्या परिसरात पर्यावरणाच्या रक्षणाच्या दृष्टीनं काय पावलं उचलली आहेत, याबाबतची प्रतिज्ञापत्रं २ आठवड्यांच्या आत सादर करावं, असंही न्यायालयानं राजस्थान, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश सरकारला सांगितलं.

<><><><>

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधी पक्षांच्या नेत्यांसह शेकडो समर्थकांनी आज निवडणूक आयोगावर मोर्चा काढला. पोलिसांनी हा मोर्चा निवडणूक आयोगापासून साधारण २०० मीटर अंतरावर आकाशवाणी भवनाच्या बाहेर अडवल्यानंतर आंदोलकांनी संसद मार्ग पूर्णपणे बंद केला. मोर्चा अडवल्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पोलिसांच्या बॅरिकेडवर चढून तिरंगा ध्वज फडकावला आणि पोलिसांना

हुलकावणी देत त्यांनी आकाशवाणी भवनात प्रवेश केला आणि ठिय्या मांडला. त्यांच्यासोबत खासदार प्रियंका गांधी यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. थोड्याचवेळापूर्वी पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं आणि आकाशवाणी परिसरातून हटवण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, निवडणूक आयोगाला कोणत्याही राजकीय पक्षाकडून भेटीची विनंती मिळालेली नाही, असं आयोगाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

राज्यघटनेनं निर्माण केलेल्या संस्थांना बदनाम करून त्यांच्यावरचा विश्वास कमी करायचा आणि त्या संस्था न्याय देऊ शकत नाहीत, अशी भावना लोकांच्या मनात निर्माण करण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत केली. राज्यघटनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचं त्यांचं षड्यंत्र आहे, असंही ते म्हणाले.

**होल्ड... बाईट- देवेंद्र फडनवीस**

एमपीएससीच्या अध्यक्षांचा राजीनामा घेणं किंवा त्यांना हटवणं हे राज्य सरकारच्या हातात नाही, सर्वोच्च न्यायालयाच्या शिफारशीवरून त्यांना हटवण्याचा अधिकार फक्त राष्ट्रपतींना आहे, आजी आणि माजी अध्यक्षांसह संपूर्ण आयोगाची चौकशी करायची सरकारची तयारी आहे आणि गैरप्रकार आढळून आला, तर राष्ट्रपतींना शिफारस करायलाही सरकार मागेपुढे पाहणार नाही. यासंदर्भात राज्यपालांनाही विनंती केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यात सध्या पीक नुकसानीचे ४५ टक्क्यापेक्षा जास्त पंचनामे पूर्ण झाले आहेत. दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईत झालेल्या बैठकीत ही माहिती दिली. उर्वरित पंचनाम्यांचं काम जलद गतीनं पूर्ण करण्याचे निर्देश सरकारनं दिले आहेत. राज्यात आतापर्यंत केवळ ८ टक्केच पीक कर्जवाटप झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. बँकांनी शेतकऱ्यांकडे वारंवार कागदपत्रांची मागणी करू नये, एकदा पीक कर्ज घेतलं असेल तर पुन्हा कागदपत्रं मागू नयेत, असे निर्देश त्यांनी दिले.

जमिनीत ओलावा आणि मर्यादित पाण्याची उपलब्धता असलेल्या भागांत रब्बी हंगामात हरभरा आणि ज्वारी पिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. केंद्र शासनाने ज्वारीच्या

शंभर टक्के खरेदीला मान्यता दिल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असं बावनकुळे यांनी सांगितले. आणखी काही तालुक्यांचा समावेश दुष्काळी तालुक्यांमध्ये करण्याच्या मागण्यांची प्राथमिक पाहणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले असून त्यांचा अहवाल प्राप्त होईल. या अहवालाच्या आधारे संबंधित तालुक्यांच्या समावेशाबाबत मंत्रिमंडळ उपसमिती निर्णय घेईल, असं त्यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय समिती येत्या १० किंवा १२ तारखेला राज्यात दोन दिवसांच्या दौऱ्यावर येणार आहे. ही समिती तीन स्वतंत्र पथकांद्वारे बीड-धाराशिव, यवतमाळ-वाशिम आणि अहिल्यानगर-सोलापूर या जिल्ह्यांचा दौरा करून आढावा घेईल, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यातल्या धरणांमधे ७४ टक्के पाणीसाठा राहिला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत तो १५ टक्क्यांनी कमी आहे.

<><><><><>

पाकिस्तानात पदच्युत प्रधानमंत्री इम्रान खान यांच्या सुटकेसाठी त्यांचा पक्ष तेहरीक-ए-इन्साफने पुकारलेला लाँग मार्च स्थगित करावा आणि चर्चेला यावं असं आवाहन तिथले प्रधानमंत्री शाहबाज शरीफ यांनी केलं आहे. चर्चेनं प्रश्न सोडवावा अन्यथा बळाचा वापर करावा लागेल असा इशारा शरीफ यांनी दिला. इम्रान खान २०२३ पासून तुरुंगात असून त्यांच्याशी बोलू द्यावं अशी त्यांच्या समर्थकांची मागणी आहे.

<><><><><>

यंदाचा भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार फ्रान्सिस हालझेन यांना जाहीर झाला आहे. बेल्जियममध्ये जन्माला आलेले हालझेन अमेरिकेच्या विस्कॉन्सिन विद्यापीठात कार्यरत आहेत. आइस क्युब न्युट्रिनो वेधशाळा आणि उच्च ऊर्जा क्षमता असलेल्या न्यूट्रिनोंच्या शोधासाठी त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. १२ लाख डॉलर अशी या पुरस्काराची रक्कम आहे.

<><><><><>

भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरनं कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. हरमनप्रीत कौर २०१८ पासून, टी-२० भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार आणि २०२२ पासून एकदिवसीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार होती.

<><><><><>

वेस्ट इंडिज विरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेला पहिला साामना आज लखनौमध्ये सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा वेस्ट इंडीजच्या १४ व्या षटकात ६ बाद १२१ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

भारताबरोबरच एकंदर ७ देश २०३६च्या ऑलिम्पिक स्पर्धांचं यजमानपद भूषवण्यासाठी इच्छुक आहेत. नोव्हेंबर महिन्यात या देशांना आयोजनाच्या संदर्भातल्या सादरीकरणासाठी बोलवलं जाईल, अशी माहिती आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीनं दिली आहे.

//<><><><><>//